कोर्ट विद्यमान तहसिलदार सेलु यांचे कार्यालय

मामला क्रं. 8 एन.ए.पी-34/निवसी अकृषक/2019-2020
तहसिल सेलु जिल्हा वर्धा

वाचा:- (1) महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम 1966 कलम 42 व 44
(2) महाराष्ट्र जमीन महसुल (जमीनीच्या वापरात बदल व अकृषक आकारणी) नियम 1969
(3) अर्जदार राजेश मोतीलालजी जैयस्वाल रा.सेलु जि.वर्धा

अंतिम आदेश
पारित दिनांक 24 / 02 /2020

1) अर्जदार राजेश मोतीलालजी जैयस्वाल रा.सेलु ता.सेलु जि.वर्धा यांनी खालील तपशिलातील जमीन निवासी वापरण्याकरिता अकृषक अभिन्यास प्रयोजनार्थ मंजुरी मिळण्याकरिता महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम 1966 कलम 42 व 44 अंतर्गत परवानगी मिळण्याबाबत अर्ज हया कार्यालयात सादर केलेल्या अर्जावरुन प्रकरण पंजीबध्द करण्यात आले.

जमिनिचा तपशिल खालील प्रमाणे

मौजा	शेत स.न.	क्षेत्रफळ	आकारणी	शेताचे हक्क	पैकी क्षेत्र	प्रयोजन
सेलु	102/अ/3	0.81 हे.आर.	9.45	वर्ग-1	0.81 हे.आर.	निवासी वापराकरिता कृषक

अर्जदारांने उपरोक्त तपशिलातील भुमापन क्रमांक 102/अ/3 आराजी 0.81 हे.आर. जमीन निवासी वापरण्याकरिता अकृषक अभिन्यास प्रयोजनार्थ मंजुरी मिळण्याची परवानगी महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम 1966 कलम 42 व 44 अंतर्गत परवानगी मिळण्याबाबत मागणि केल्यावरुन खालील प्रमाणे नियमानुसार कार्यवाही करण्यात आली.

2) उपरोक्त तपशिलातील कृषक जमीन मौजा सेलु मधील असुन ती नगर पंचायत अंतर्गत येत नाही.सदर्हु जमीनीबाबत या कार्यालयाचे क्रमांक प्रस्तु-1/तह.सेलु/अकृषक/कावि- क्यु /2016 दिनांक 14.06.2016 रोजी जाहिरनामा काढुन आक्षेप/हरकती मागविण्यांत आल्या विहीत मुदतीत दिनांक 30.06.2016 पर्यत आक्षेप /उजर मागविले असता कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेमार्फत हरकती या कार्यालयात प्राप्त झाल्या नाहीत.

या कार्यालयाचे पत्र क्रमांक प्रस्तु-1/तह.सेलु/अकृषक/कावि-क्यु/2016 दिनांक 14.06.2016 अन्वये खालील विभागाचे अभिप्राय मागविण्यात आले.

विविध विभागाचे अभिप्रायाचे विवरण खालील प्रमाणे

अ. क्र.	विभागाचे नांव	अभिप्रायाचा क्रमांक	दिनांक	सहमत/असहमत	शेरा
1.	नगर रचनाकार,वर्धा	नगर रचनाकार,वर्धा यांचे पत्र जा.व.अकृषक/मौ. सेलु/ स.क्र.102/अ/3 नरब/2190	दि. 30.11.19	सहमत सिमांकित अभिन्यास नकाशे योग्य असल्याने पत्र क्र.2190 मध्ये नमुद असलेल्या अटीवर मंजुरीची शिफारस केलेली आहे.	Recommended for Approval

तहसिलदार सेलु

2.	का.अ सार्वजनिक बांधकाम विभाग,वर्धा	यांचे पत्र क्र.जा.क्र.5090/ आरे/का.2 (8) अकृषक 2016	दि. 8.09.016	सहमत	उपविभगीयअभियंता,सां.बां,उपविभाग सेलु यांनी सदर जागेची मौका पाहणी केलेली असुन असे निदर्शनास येते की,प्रस्तावित जागा ही या विभागाच्या अधिपत्या खालील कोणत्याही रस्त्यालगत येत नसुन सदर प्रस्तावित जागा ही नागपुर-बोरी-वर्धा-तुळजापुर रस्ता प्र.रा.मा.क्र.6 (नविन राष्ट्रीय महामार्ग क्र.361) वरील कि.मी.61/500 मध्ये रस्त्याच्या उजव्या बाजुस रस्त्यालगतच्या नागरी भागात असल्यामुळे,व सदर रस्ता कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग विभाग सिव्हील लाईन नागपुर यांचे हद्यीत येत असल्यामुळे त्यांचे स्वतंत्र नाहरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे, तसेच संबंधित नगर पंचायत सेलु यांचे हद्यीत येत असल्यामुळे त्यांची सुध्दा नव्याने नाहरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक असल्याचे नमुद आहे.त्याअन्वये नगर पंचायत सेलु यांचे दि.21.302018 रोजीचे पत्रान्वये नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त झाले असुन प्रकल्प व्यवस्थापक NHA IPIU यवतमाळ यांचे पत्र क्र.NHAI/PIU/YT+L/NOC-SELOO/2018/1070 दि.3.05.2016 अन्वये नाहरकत प्राप्त झाले आहे.
3.	का.अ महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,मर्या वर्धा	क्र.कार्या/अभि/वर्धा विभाग 09/2016/अकृषक/एन.ओ.सी.16-17	दि. 12.08.16	सहमत	उपकार्यकारी अभियंता सेलु यांनी सादर केलेल्या अहवालानुसार मौजा सेलु येथील भुमापन क्रमांक 102/अ/3 आराजी 0.81 हे.आर.पैकी 0.81 हे.आर. या खाजगी जमीनमध्ये कोणत्याही प्रकारची विद्युत वाहीनी अस्त्विात व प्रस्तावित नसल्याचे पत्रात नमुद केले आहे.
4	उपविभागीय अभियंता पाटबंधारे उप विभाग सेलु	जावक क्र.1182/रेशा//अकृषक /2016	दि. 9.08. 16		विषयांकित शेतजमीनीचे मौजा सेलु ता.सेलु जि.वर्धा हे गाव जिल्हयातील कोणत्याही प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रात येत नसल्यामुळे 0.81 हे.आर. शेतजमीनीचे निवासी प्रयोजनार्थ अकृषक परवानगी करिता नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे.
5.	उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन)वर्धा अधिकारी,वर्धा	जावक क्र.अ.का/पुनर्व/का वि-1105/2016	दि. 30.6.16		या कार्यालयाच्या लाभ क्षेत्रात येत नसल्यामुळे या कार्यालयाचा अभिप्राय निरंक समण्यांत यावे असा अहवाल या कार्यालयाचा प्राप्त झाला आहे.

6	विशेष भुअर्जन अधिकारी लसिका, वर्धा	जा.क्रंअ.का/उजि/ भुसं/लसिका/कावि -650/2016	दि. 5.8.16	सहमत	मौजा सेलु येथील सर्व्हे क्र.102/अ/3 भुसंपादनात येत नाही किंवा भुसंपादनासाठी प्रस्तावित नसल्याचे नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे
7	जिल्हा स्वास्थ अधिकारी,वर्धा	NO/DHO/UIP/ SITE/Inop/33-1063/2016	दिनांक 20.08.16		मौजा सेलु येथील सर्व्हे क्र.102/अ/3 The Site is proposed for residential purpose बाबत नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे.
8	तलाठी सेलु	जा.क्र.	दि. 30.08.19		तलाठी मौजा सेलु यांचा दि.30.8.2019 रोजी विषयांकित शेतजमीनीचा 32 मुद्दयाचा चौकशी अहवाल प्राप्त झाला असुन सदर शेतजमीन गैरकृषी करण्यास हरकत नसल्याचे नमुद आहे.
9	उपकार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग विभाग,नागपुर	जा.क्र.3212/तां. शा/आरे/2017 दिनांक 4.09.2017			सदर जागा ही नागपुर-बोरी-वर्धा-तुळजापुर राष्ट्रीय महामार्ग क्र.361 वरील कि.मी.484/650 मध्ये रस्त्याच्या डाव्या बाजुस आहे.सदर महामार्ग या कार्यालयाकडे तात्पुरत्या रित्या देखभाल व दुरुस्तीकरिता असल्याने,सदर जागा अकृषक करण्यास्तव या कार्यालयाव्दारे अभिप्राय /नाहरकत प्रमाणपत्र देण्यात यावे.असे नमुद आहे यावरुन प्रकल्प संचालक भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण हिलटॉप रामनगर,नागपुर यांचे पत्र क्र. अन्वये नाहरकत प्राप्त झाले आहे.
10	मुख्याधिकारी, नगर पंचायत, सेलु	जा.क्र. नपसे/कावि. 18	दि. 21.3.18		नगर पंचायत कार्यालय सेलु यांचे पत्र क्र.18 दिनांक 21.3.2018 अन्वये विषयांकित सर्व्हे क्रमांकाचे 0.81 हे.आर.क्षेत्राचे निवासी प्रयोजनार्थ नमुद अटी शर्तीच्य अधिन राहुन ना-हरकत प्रमाणपत्र सादर केले आहे.

अकृषक जमीनच्या विस्तृत तपशिल त्यावरील आकारणी

सर्व्हे क्र.	आराजी हे.आर.	आराजी चौ.मि.	प्रति चौ.मि.आकारणी
102/अ/3	0.81 हे.आर.	8100 चौ.मिटर	

सर्व्हे क्रमांक स.न.102/अ/3

आराजी सर्व्हे क्रमांक 102/अ/3	8100.00	
ओपन स्पेस	813.27	चौ.मि.
वापराखालील क्षेत्र	4537.16	चौ.मि.
रस्त्या खालील क्षेत्र	2749.57	चौ.मि.

भुखंडाच्या तपशिल स.न.102/अ/3

भुखंड क्रमांक	एकुण भुखंड	भुखंडाचे क्षेत्र	एकुण भुखंडाचे क्षेत्र	भुखंडनिहाय अकृषक सारा
1	2	3	4	5
1	1	1254.75	1248.70	24974
2	1	195.75	191.40	3828
3,4	2	144.00	288.00	5760
5	1	182.70	182.70	3654
6	1	306.00	301.65	6033
7 ते 12	6	120.00	720.00	14400
13	1	216.00	211.65	4233
14	1	137.81	137.81	2756
15 ते 18	4	105.00	420.00	8400
19	1	148.75	148.75	2975
20	1	138.45	134.10	2682
21	1	102.21	102.21	2044
22	1	103.84	103.84	2077
23	1	105.46	105.46	1901
24	1	107.09	107.09	2142
25	1	133.80	133.80	2676
एकुण 25		3501.61	4537.16	90743

भुखंडाचा तपशिल स.न.102/अ/3

आकारणी	रुपये	भरणा करण्याचा तपशिल	नियम
अकृषक कर	8100	प्रति वर्ष	कलम 110
जिल्हा परिषद	56700	प्रति वर्ष	कलम 110
नगर पंचायत/ग्रा.प.	8100	प्रति वर्ष	कलम 110
परावर्तीत कर	40500	एकदाच	कलम 110
एकुण	113400		

एकंदरीत प्रकरणात नियमानुसा कार्यवाही करण्यात आली असुन तसेच संबंधित सर्व विभागाचे विहीत मुदतीत अहवाल/अभिप्राय कामकाज या कार्यालयात प्राप्त झाल्यामुळे अर्जदाराने मागीतलेल्या अकृषक परवानगीस सहमत असल्याचे गहीत धरुन महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम 1966 कलम 42 व 44 अन्वये मौजा सेलु तहसिल सेलु येथील भुमापन क्रमांक 102/अ/3 आराजी 0.81 जमीन निवासी वापरण्याकरिता अकृषक अभिन्यास प्रयोजनार्थ मंजुरी मिळण्याची परवानगी देण्याबाबत मला प्राप्त अधिकारांच्या वापर करुन मी एम.ए.सोनोने,तहसिलदार,सेलु अर्जदार राजेश मोतीलालजी जैयस्वाल रा.सेलु ता.सेलु जि.वर्धा यांचे मालकी व कब्जातील उपरोक्त तपशिलातील उक्त भुमापन क्रमांक 102/अ/3 आराजी 0.81 अकृषक प्रयोजना करिता भु-परावर्तीत करण्याबाबत आदेशात नमुद केलेल्या संबधीत विभागाच्या **अटी व शर्ती अधीन राहुन पुढील अटीच्या अधिन राहुन आदेश पारीत करीत आहे.**

नगर रचनाकार,वर्धा यांचे पत्र जा.क्र. अकृषक मौ.सेलु/ता.सेलु/स.क्र.102/अ/3/नरव/2190 दि. 30/11/2019

- 1) शासनाकडील निर्देशांचे अनुषंगाने प्रचलीत नियमावली तरतुदीनुसार विकास शुल्काचा भरणा संबंधित नियोजन प्राधिकरणाकडे करणे अर्जदारास /विकासकास बंधनकारक राहील.
- 2) उक्त अभिन्यासातील रस्त्याचे खंडीकरण नालीचे बांधकाम व इतर योग्य प्रकारे झाला असल्याबाबतचे रूपये 100 चे स्टॅम्प पेपरवर शपथपत्रासहचे हमी पत्र अर्जदार यांनी आदेशाचे दिनांकापासुन एक महिण्याचे आंत या कार्यालयास सादर करावे.
- (3) अभिन्यासातील खुली जागा, सुविधा क्षेत्र (Amenity plot) रस्ते या व्यतिरिक्त इतर सर्व भुखंडाचा उपयोग
- निवासी प्रयोजनार्थ करण्यात यावा.
- (4) अभिन्यासातील खुली जागा,रस्ते इत्यादी विकसीत करून स्थानिक प्राधिकरणाकडे विनामुल्य हस्तांतरीत करणे बंधनकारक राहील.
- (5) अर्जदार/जमीन मालक यांनी स्वखर्चाने भुखंडधारकांना पुरेल इतक्या पाण्याची व्यवस्था करावी.
- (6) अभिन्यासातील भुखंडावरुन विद्युत दाब वाहिनी गेली असल्यास आवेदकाने/विकासकाने स्वखर्चाने रस्त्याच्या कडेला स्थंलातरीत करावे.
- (7) अभिन्यासात सार्वजनिक पाणी पुरवठयाची व सांडपाण्याची प्रक्रिया करुन विल्हेवाट करण्याची व्यवस्था जमीन मालक/विकास यांनी स्वत:चे खर्चाने करणे आवश्यक राहील.
- (8) सदर जागेवर पिण्याचे पाण्याची उपलब्धता असल्याबाबत संबधित विभागाचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक राहील.
- (9) अभिन्यासातील भुखंडात बांधकाम करताना क्षेत्राकरिता लागु असणा-या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियम लागू असलेल्या बांधकाम विषयक नियमाचे पालन करावे. इतर बाबतीत स्थानिक प्राधिकरणाचे नियमाचे पालन करावे.
- (10) सदर जागेतील वृक्षाचे संरक्षण करुन प्रत्येक भुखंड धारकाने वृक्षाचे संवर्धन करावे.
- (11) सदरची शिफारस ही आवेदकाच्या मालकीच्या जागेपुरतीच मर्यादीत असुन, आवेदकाच्या मालकीच्या नसलेल्या जागेचा विकास करण्याकरिता ही शिफारस लागु होणार नाही.
- (12) पावसाचे पाण्याचे जलसंवर्धन (RAIN WATERHARVESTING) ची व्यवस्था अभिन्यासास करावी लागेल.
- (13) विषयांकित जागेच्या अभिन्यासामधील भुखंडावर कोणत्याही प्रकारचे बांधकाम सुरु करण्यापुर्वी अर्जदारास बांधकाम नकाशे स्थानिक नियोजन प्राधिकरणाकडुन /सक्षम प्राधिकरणाकडुन मंजुर करून घेणे आवश्यक राहील.
- (14) भविष्य काळात अभिन्यासातील भुखंडाचे विभाजन करु नये.
- (15) महाराष्ट्र लॅन्ड रेव्हेन्यु रुल्स 1969 (जमीनीच्या वापरातील बदल व अकृषीक कर आकारणी) च्या कलम 4 च्या अटीचे पालन करावे.
- (16) प्रदुशन नियंत्रन मंडळ अग्निशामक विभाग व इतर बाबतीत संबधीत विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.
- (17) जागेचे मालकी हक्क अभिन्यासाच्या हद्दी व क्षेत्रफळाबाबत तसेच पोच रस्त्याबाबत तफावत अथवा काही वाद उपस्थित झाल्यास ही शिफारस रद्द समजण्यात यावी.
- (18) वरील अटीची पुर्तता होतांना अभिन्यासात फेर बदल झाल्यास सुधारीत अभिन्यासास मंजुरी प्राप्त करुन घ्यावी लागेल.
- **कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग,वर्धा यांचे पत्र जा. क्र.5090/आरे/का-2(8)/अकृषीक/2016 दिनांक 08/09/2016 प्राप्त झालेल्या नाहरकत प्रमाणपत्राच्या आधारे .**

- 1) अर्जदाराने उक्त नमुद अभिन्यासाची उपअधिक्षक भुमि अभिलेख सेलू यांचेकडुन जागेवर आखणी करतांना सभोवतालचे मंजूर अभिन्यासातील रत्याशी योग्य रितीने सतन्वये साधून मोजणी नकाशासह आखणी अभिन्यासाच्या चार प्रती वास्तुविशारदाच्या स्वाक्षरीने अंतिम मंजुरी करिता रेखांकन धारकाने नगरपंचायत सेलू यांचेकडे सादर करावा.
- 2) जमिनीचे तात्पुरते रेखांकन मंजुरीकरीता सुरूवातीला तात्पुरत्या स्वरूपात रेखांकन मंजूर करण्यात आल्यास सदर परवानगी हि केवळ विकसन करण्यासाठी राहील या तात्पुरत्या परवानगीचे आधारे विकासकास प्लॉट करून विकता येणार नाही.
- 3) रेखांकित जमिनीवरील रेखांकित रस्ते जमिनीच्या प्रतवारिनुसार (WBM) पर्यंत योग्य त्या दर्जाच्या पायासह उपलब्ध करून देण्यांत यावे.
- 4) रस्त्याचे बाजुला योग्य त्या आार/उताराची व आवश्यक त्या रचनेची सांडपाण्याची (गटर्स/नाल्या) ची व्यवस्था करावी लागेल.
- 5) रेखांकित जमिनीवरील आवश्यक तेथे सार्वजनिक दिवाबतीची व्यवस्था इलेक्ट्रिक पोलसह करावी लागेल.
- 6) रेखांकित जमिनीमध्ये नियमानुसार मोकळया ठेवायच्या भुखंडभोवती कुंपणाची व्यवस्था करावी लागेल.
- 7) अभिन्यासामध्ये एक सार्वजनिक विहीत किंवा बोअरवेलची व्यवस्था करावी लागेल.
- 8) लेआऊटमधील रोडच्या दुतर्फा वृक्षरोपण करणे बंधनकारक राहील.
- 9) अभिन्यास धारकाने रेखांकित जमिनीवर नागरीसुविधा देताना त्याचा दर्जा न.प.स्वत: ज्या गुणवतेनुसार नागरीसुविधा नागरिकांना पुरविते त्या दर्जानुसार पुरविणे बंधनकारक राहील.
- 10) जमिनीच्या रेखांकनास अंतिम मंजुरी प्राप्त झाल्यानतरच प्लॉट ची न.पं.कर आकारणी सूचित नोंद घेण्यात येईल. त्यानंतर सदर भूखंड/प्लॉट करिता येणारा कर नियमितपणे भरणा करणे रेखांकन धारकास/प्लॉट धारकास बंधनकारक राहील.
- 11) अभिन्यासास नगररचनाकार,उपविभागीय अधिकारी/अप्पर जिल्हाधिकारी यांची मान्यता मिळाल्यास त्याची एक प्रत नगर पंचायत सेलू जि.वर्धा यांना सादर केल्यानंतर अंतिम मंजुरी देण्यात येईल.
- 12) अभिन्यासातील नियमानुसार मोकळा ठेवलेला भूखंड आणि रस्ते नगरपंचायत ला हस्तांतरित करण्याकरीता अभिन्यासधारकाने रितसर (हक्कसोड लेख) विहित मुद्रांकावर जिल्हाधिकारी वर्धा यांची अंतिम मंजुरी मिळण्यापुर्वी लिहून दयावी लागेल.
- 13) आपनाकडून वरील प्रमाणे पूर्तता झाली नसल्यास रेखांकनास दिलेली तात्पुरती परवानगी रद्द करण्यात येईल तसेच रेखांकित जमिनीवर कोणत्याही बांधकामास परवानगी देण्यार नाही नोंद घ्यावी
- 14) उपरोक्त पैकी अटीची पुर्तता करण्याची जबाबदारी संबंधित रेखांकन धारकाची असेल. सदर बाबीची पुर्तता न केल्यास सदर नाहरकत रद्द समजण्यात येईल.
- प्रकल्प संचालक भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण हिलटॉप रामनगर,नागपुर यांचे पत्र क्र.No.NHAI/PIO/YTL/NOC/SELOO/2018 1070 दिनांक 03/05/2018 अन्वये नविन एनएच-1361 चे नवीन विषय एनटीओ-11 चे संरेखन बरेच दूर आहे. म्हणुनच कृषी व बिगर शेतीमध्ये जमीन बदलण्यासाठी एनओसी खाली नमुद केल्या प्रमाणे अटी शर्तीचे पालन करण्यांत यावे.
- 1) प्रकल्प संचालक भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण हिलटॉप रामनगर,नागपुर यांचेकडुन प्राप्त झालेली ना-हरकत प्रमाणपत्र हे केवळ निवासी प्रयोजनाकरीता अकृषक जमिनीसाठी असुन राष्ट्रीय महामार्गाकरीता समांतर रस्त्याकरीताची परवानगी मानता येणार नाही.
- 2) प्रकल्प संचालक भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण हिलटॉप रामनगर,नागपुर यांचे पुर्व परवानगीशिवाय राष्ट्रीय महामार्गाला सदर ले-आऊटमधिल अंतर्गत रस्त्यांचा थेट संपर्क/वाहतुक राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 361 मार्गावर करता येणार नाही. व याकरीता रस्ते वाहतुक व महामार्ग मंत्रालयाच्या दिनांक 27/07/2013 च पत्रातील निर्देशान्वये आवश्यक त्या परवानगया प्राप्त करून घेण्याची जबाबदारी अर्जदार यांची राहील.
- 3) कोणत्याही इमारतीच्या बांधकामाची परवानगी एन.एच.पासुन थेट प्रवेश करण्यास परवानगी राहणार नाही. प्रस्तावित जागेवर/भूखंडावर पुर्वीची परवानगी रस्ता परिवहन व महामार्ग मंत्रालयाच्या (एमओ आरटीएओ)

मार्गदर्शक सुचना आरडब्ल्यु/एनएच-33002/1/डी.नुसार अनिवार्यपणे घ्यावी लागेल. 111 दिनांक 24/07/2013 नुसार कोणतेही बांधकाम/क्रीयाकलाप सुरू होण्यापुर्वी Construction अर्जदाराने हे सुनिचित केले पाहिजे की, कोणत्याही बांधकाम विकास/क्रियाकलापामुळे राष्ट्रीय महामार्गाच्या ड्रेनेज सिस्टमध्ये अडथळा येऊ नये. N.A. च्या कारणामुळे एन.एच.च्या सुरळीत कामकाजात अडथळा येणार नाही विकास/क्रियाकलाप विचाराधीन भुमीशी संबंधित एन.आय.आय.च्या सुलभ कामकाजामध्ये कोणत्याही अडथळयामुळे, एनआयआयची जबाबदारी अर्जदारावर एनएलआयच्या कोणत्याही कामकाजाच्या नुकसानिसाठी अर्जदार जबाबदार राहील.

- 4) राष्ट्रीय महामार्गावर अर्जदाराकडुन कोणत्याही वेळी अतिक्रमण होणार नाही. एनएचएएलच्या आरओ मध्ये कोणतेही जाहिरात बोर्ड दर्शविले जाणार नाही.
- 5) अर्जदाराने स्वत:च्या जमिनीत वाहने पार्किंगसाठी स्वतंत्र व्यवस्था करावी. वाहने एन.एच.हद्दीत उभी नसाव्यात आणि कुठल्याही विकास /कार्यामुळे एनएचवर वाहनांना रांगेत उभे ठेवु नये. वेळोवेळी दिलेली सर्व मॉरथ आणि एनएचए आय.मार्गदर्शक तत्वे कोटेकोरपणे पाळली जावीत त्यासाठी एनएचएआय जबाबदार राहनार नाही.
- 6) अशा कोणतीही साईट निवडीसाठी ज्यांचा प्रवेश रस्ता वाहतुक आणि महामार्ग मंत्रालयाच्या मार्गदर्शनाची आवश्यकता दिनांक 03/08/2000 आणि 25/09/2003 आणि त्यानंतरच्या सुधारणेसाठी त्यासाठी एनएचएआय जबाबदार राहनार नाही.जबाबदार नाही.
- 7) भूमीच्या वापरामुळे निर्माण झालेले वादळ पाणी, सांडपाणी व इतर सांडपाणी इत्यादी रस्त्याच्या हद्दीत विल्हेवाट लावता येणार नाही. त्याकरीता स्वतंत्र गटार योजना मंजुर केल्या जावे. अर्जदार यांनी एनएचएआय वरील कोणत्याही अटीचा भंग केल्यावर ही परवानगी रद्द करण्याचे सर्व हक्क राखुन ठेवेल असे कोणत्याही कारणाशिवाय कोणतेही कारण न सांगता कोणत्याही वेळी नियम लागु करेल.
- 8) प्रस्तावित जागेत कोणतेही बांधकाम नियमास अनुसरुन असावे व शासकिय जागेत/हद्दीत अतिक्रमण करु नये.अन्यथा असे बांधकाम कोणतीही पुर्व सुचना न देता पाडण्यात येईल.
- 9) नियंत्रण रेषेच्या आंत कोणतेही बांधकाम केल्यास पुर्वसुचना न देता काढण्यात येईल व काढण्याकरिता येणारा खर्च संबंधिताकडुन वसुल करण्यात येईल.

(एम.ए.सोनोने)
तहसिलदार,सेलु

तहसिलदार, सेलू

प्रतिलिपी :- 1) अर्जदार राजेश मोतीलालजी जैयस्वाल रा.सेलु ता.सेलु जि.वर्धा यांना आदेश अभिन्यास नकाशासह अग्रेषित.
2) तलाठी मौजा सेलु यांना माहिती करिता अग्रेषित यांनी नोंद घेवुन गाव नमुना-2 मध्ये नोंद घेवुन नमुने अदयावत करावे
3) उपअधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय सेलु यांना माहिती व आवश्यक कार्यवाहिकरीता अग्रेषित.
5) सचिव नगर पंचायत,सेलु यांना माहिती करिता अग्रेषित.
6) निवडनस्ती

25/12/2020
तहसिलदार,सेलु

तहसिलदार सेलू

तहसिलदार सेलू